दिनेश
बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे सहसंपादक : तुकाराम कामठे

या गुढी पाडव्याला आपल्या घराला द्या नवीन आणि आधुनिक साज!
इंटेरिअर डिझायनर श्रेया निलाखे
घर, फ्लॅट व ऑफिससाठी आकर्षक आणि आधुनिक इंटेरिअर डिझाईन.
- आधुनिक व मिनिमल डिझाईन
- स्मार्ट स्पेस प्लॅनिंग
- बजेटमध्ये सुंदर इंटेरिअर सोल्युशन्स
संपर्क: 75-59-26-16-75

वर्ष ५ । अंक १९७ । सोमवार २७ एप्रिल २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

## वन मजुराला बांधून चंदनाची झाडे तोडून नेणारे दोघे जेरबंद

### वन विभागाच्या जिल्हा कार्यालयात घडली होती घटना

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** वन कर्मचाऱ्याला बांधून, वन विभागाच्या जिल्हा कार्यालयातील चंदनाची दोन झाडे तोडून त्याची चोरी करणाऱ्या दोघा आरोपींना स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने मुद्देमालासह जेरबंद केले आहे. मसीद नसीब गोलवाल (वय २४ वर्षे) व शाहीदखा अलीखा कलेसे वय २६ वर्षे, रा. रा. जंजाळा, ता. सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर) अशी अटक आरोपींची नावे आहेत. त्यांचे दोन साथीदार फरार आहेत.

दिनांक १८ एप्रिल रोजी मध्यरात्री सव्वा दोन वाजेच्या सुमारास चौघा अनोळखी आरोपींनी विभागीय वन कार्यालयात तैनात असलेले वनमजूर रमेश पोपट शेळके (वय ५८ वर्षे, रा. गुंडेगांव, ता. जि. अहिल्यानगर) यांना अशोकाच्या झाडास बांधून सहाय्यक वन संरक्षक यांच्या निवासस्थानाजवळील दोन चंदनाची झाडे तोडून नेली होती. याबाबत कॅम्प पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३०९ (४), ३ (५) प्रमाणे जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



**पथकात यांचा सहभाग**

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी तसेच तपास पथकातील सपोनि हरीश भोये, उपनिरीक्षक राजेंद्र वाघ, पोलीस अंमलदार सुनील पवार, फुरकान शेख, शाहिद शेख, गणेश धोत्रे, बाळासाहेब नागरगोजे, अमृत आढाव, भाऊसाहेब काळे, बाळासाहेब खेडकर, प्रशांत राठोड, किशोर शिरसाठ, योगेश कर्डीले, भगवान धुळे, अरुण मोरे यांनी केली.

एलसीबीने घटनास्थळी भेट देऊन तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे रेकॉर्डवरील आरोपी मसीद गोलवाल (रा. छत्रपती संभाजीनगर) ■ पान ४ वर

## गोमातेच्या रक्षणासाठी मकोका सारखा कठोर कायदा व्हावा – आ. संग्राम जगताप

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** राजाने गोमातेला राजमातेचा दर्जा दिला गोमातेच्या रक्षणासाठी कायदे केले मात्र आजही गोहत्या थांबलेली नाही गो हत्या थांबायचे असेल तर त्यासाठी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी कायदा ( मकोका ) सारखा व्हावा या व इतर मागण्यांचे निवेदन आमदार संग्राम जगताप यांच्या नेतृत्वात तहसीलदार यांना देण्यात आले.

गोमातेच्या रक्षणासाठी शासनामार्फत विविध कायदे करण्यात आले राज्य मातेचा दर्जा देण्यात आला मात्र त्याची अंमलबजावणी कठोरपणे होत नसल्याने संघटित पद्धतीने गोमातेची तस्करी–हत्या आजही होत आहे हे चित्र उद्विग्न करणारे आहे. यासाठी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी कायदा अर्थात मकोकासारखा कठोर कायदा लोकसभेत संमत व्हावा. गोमातेला राष्ट्रमातेचा दर्जा मिळावा, गोमातेचे संगोपन करणाऱ्यांना शासनामार्फत अनुदान देण्यात यावे, या सर्वांसाठी केंद्र शासनाने स्वतंत्र गोमंत्रालय स्थापन करावे आदी मागण्यांचे २१ हजार नगरकरांच्या सह्यांचे निवेदन तहसीलदार व नायब तहसीलदार यांना देण्यात आले.

याप्रसंगी बापू ठाणगे यांनी गोमातेचे रक्षण करणे हे राष्ट्रीय कर्तव्य असून यासाठी हिंदू धर्मात धर्मीय पुर्ण देशभर एकवटले असून आज एकाच वेळी काश्मीरपासून कन्याकुमारी पर्यंतच्या पाच हजार तहसील कार्यालयांमध्ये निवेदन देण्यात येत आहे. ही ऐतिहासिक घटना आहे. संत मंडळींच्या आवाहनाला प्रतिसाद देत देशभरातून गो सेवक, गोप्रेमी मोठ्या संख्येने मागण्यांचे निवेदन देत आहेत. अहिल्यानगर मध्ये ही भिंगार, केडगाव, सावेडी व विविध उपनगरातील नागरिकांनी उस्फूर्तपणे निवेदनावर सह्या केल्या आहेत. शहराप्रमाणेच जिल्ह्यातील १४ तालुक्यांमध्ये ही अशाच प्रकारचे निवेदन एकाच वेळी देण्यात येत आहे अशी माहिती दिली.



सावेडीतील दिनूभाऊ कुलकर्णी जॉगिंग ट्रॅक परिसरात सर्व गो प्रेमी सकाळी एकत्र जमले होते. भजनी मंडळाच्या वारकऱ्यांनी भजन संकीर्तन करून गो मातेच्या रक्षणासाठी आवाहन केले. भाजपा नेते महेंद्र भैय्या गंधे, सौ. मिनल गंधे, नगरसेवक ऋग्वेद गंधे यांनी सहभागी वारकरी संप्रदायातील विद्यार्थ्यांचे पूजन करून पदयात्रा मार्गस्थ झाली. यावेळी सर्व गोप्रेमीवर पुष्पवृष्टी करण्यात आली.

कलानगर चौक, छत्रपती संभाजी महाराज चौक मार्गे समर्थ विद्यामंदिर वरून धर्मवीर चौक येथे पदयात्रा भजन संकीर्तन करत आली तेथे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या पुतळ्याला गोसेवकांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला व तेथून सर्व गो सेवक तहसीलदार कार्यालयात जमा झाले.

तहसीलदार, नायब तहसीलदार व अधिकाऱ्यांनी या पदयात्रेला कार्यालयाबाहेर सामोरे येत निवेदन स्वीकारले. याप्रसंगी माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी, महामहीम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, ■ पान ४ वर

## एआयचे केंद्र बनण्याची अहिल्यानगरची क्षमता – आ. संग्राम जगताप

### नगरमधील ग्रामीण एआय समिट २०२६ ला मोठा प्रतिसाद

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** आर्टिफिशियल इंटेलिजन्स अर्थात एआय आज परवलीचा शब्द बनला आहे. जीवनातील प्रत्येक क्षेत्र एआयने व्यापले जात आहे. या आधुनिक तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर करून आपण मोठी क्रांती घडवू शकतो. विशेषतः भारतासारख्या कृषिप्रधान देशात शेती करताना एआयचा वापर केल्यास मोठे बदल घडू शकतात. अहिल्यानगर जिल्ह्यातील युवा वर्गाला एआयच्या माध्यमातून शेती विकसित करण्यासाठी प्रोत्साहन दिले तर ग्रामीण भागात सुबत्ता वाढण्यास मदत होईल. मेट्रो सिटीमध्ये सेंद्रिय कृषी उत्पादनांना मोठी मागणी असते. एआय तंत्रज्ञान सेंद्रिय शेतीसाठी मदत करणारे ठरू शकते. त्यामुळे शेती करून चांगले उत्पन्न मिळू शकते. युवा वर्गासाठी एआय तंत्रज्ञान मोठी संधी आहे. अहिल्यानगर मध्ये होत असलेल्या ग्रामीण एआय समिट मुळे युवा वर्गाला भविष्यातील दिशा मिळेल असा विश्वास आमदार संग्राम जगताप यांनी व्यक्त केला.




नितीन उदमले फाउंडेशनच्या वतीने आयोजित ग्रामीण एआय समिट २०२६ चे उद्घाटन माउली सभागृहात आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे, कृषी विपणन संचालक शरद जरे, द डेटा टेक लॅब्सचे संस्थापक डॉ. अमित आंद्रे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

विजय मुळीक, प्रा. भानुदास बेरड व अभय आगरकर उपस्थित होते.तसेच समिट मधील वक्ते रवींद्र पाल सिंग, डॉ. स्मिता काळे, अमित सिंग, डॉ. रिधिमा दुवा, दादासाहेब भगत, डॉ. निरंजन देशमुख, सुखदेव जमदाडे व मकरंद जोशी आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात आयोजक नितीन उदमले म्हणाले की, एआय भारताचे भविष्य घडवत आहे. अहिल्यानगर जिल्ह्याची ''एआय व स्टार्टअप'' क्षेत्रात देशाच्या नकाशावर ठळकपणे उदयास येण्याची क्षमता आहे. भविष्याचा वेध घेऊन नगरच्या ग्रामीण भागात आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रसार करण्यासाठी हे समिट आयोजित करण्यात आले आहे. या माध्यमातून मिळणारे तज्ज्ञांचे मार्गदर्शन युवा वर्गाला नवीन दिशा देणारे ठरेल. ग्रामीण भागातील बचत गटातील महिला, ग्रामीण कारागीर, शेतकरी यांना तंत्रज्ञानाचा वापर करून आपले उत्पादनाचे ग्लोबल मार्केटींग आणि ब्रॅण्डिंग करता येईल. या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळण्यास निश्चितच मदत होईल.

पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे म्हणाले, एलन मस्क यांनी काही वर्षांपूर्वी सांगितले की, भविष्यात जवळपास सर्वच कामं एआय तंत्रज्ञान करणार असून मनुष्याला फक्त आवडेल ते काम करता येईल. इतक मोठा बदल भविष्यात होऊ शकतो. एआय मुळं कोणाच्याच नोकरीची हमी राहणार नाही. ■ पान ४ वर

## महाराष्ट्र दुष्काळमुक्त करण्याचा संकल्प जलयात्रेच्या निमित्ताने पुर्ण करणार

### जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केला निर्धार

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**शिर्डी–** संपूर्ण जगाला श्रध्दा आणि सबुरीचा संदेश देणाऱ्या साईबाबांच्या भूमीत पुण्यश्लोक अहिल्यादेवीचा जयजयकार करीत श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर आणि चोंडी येथून निघालेल्या दोन्ही यात्रा शिर्डीत दाखल झाल्या.महाराष्ट्र दुष्काळमुक्त करण्याचा केलेला संकल्प जलयात्रेच्या निमिताने पूर्ण करण्याचा निर्धार जलसंपदा मंत्री विखे पाटील यांनी व्यक्त केला.

अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीचे त्रिशताब्दी वर्षाचे औचित्य साधून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली आणि जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांच्या संकल्पनेतून गोदा ते नमर्दा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जलयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.



यात्रेचे वैशिष्ट्य म्हणजे गोदा नदीचे उगमस्थान असलेल्या श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवीचे जन्मस्थळ असलेल्या चोंडी येथून यात्रेची सुरूवात करण्यात आली.दोन्ही यात्रा शिर्डी मध्ये एकत्रित होवून मध्यप्रदेशकडे सोमवारी रवाना होणार आहेत. राज्यातील सर्व नद्यामधून आलेल्या जलकलशाचे पूजन मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले.

शिर्डीमध्ये जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील खा.वडतुके आ.गोपीचंद पडळकर आ.सदाभाऊ खोत यांच्यासह शिर्डीकर ग्रामस्थांनी शहरातील मल्हारी मार्तंड मंदीरात पूजन करून यात्रेचे स्वागत केले.शहरातील प्रमुख मार्गावरून जलकलशाची शोभायात्रा काढून जलसंवर्धन आणि जलव्यवस्थापनाचा संदेश ■ पान ४ वर

## मनपा प्रभाग समिती क्रमांक दोन उत्कृष्ट कामगिरी करत जनरल चॅम्पियनशिपचे मानकरी

### अहिल्यानगर मनपा क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमांचा उत्साहात समारोप । आयुक्त यशवंत डांगे यांच्या हस्ते बक्षीस वितरण; खेळ–कलांमुळे ताणतणाव कमी होतो मार्गदर्शन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या विविध क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमांचा उत्साहात समारोप झाला. विजेत्या कर्मचाऱ्यांना पारितोषिक वितरण करून त्यांचा सन्मान करण्यात आला. या स्पर्धांमध्ये मनपा प्रभाग समिती क्रमांक दोनने उत्कृष्ट कामगिरी करत जनरल चॅम्पियनशिपचा मान पटकावला.



या प्रसंगी आयुक्त यशवंत डांगे यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी मनपा क्रीडा अधिकारी फिलिप्स तसेच अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी आयुक्त यशवंत डांगे म्हणाले की, ''प्रत्येकाने आयुष्यात खेळ आणि कला जोपासली पाहिजे. दैनंदिन कामकाजामध्ये येणारा ताणतणाव कमी करण्यासाठी क्रीडा स्पर्धा अत्यंत उपयुक्त ठरतात. शरीर हीच आपली खरी धनसंपत्ती असून ते निरोगी ठेवण्यासाठी नियमित व्यायाम करणे आवश्यक आहे.

ते पुढे म्हणाले, ''महापालिकेच्या कर्मचाऱ्यांनी आपल्या जबाबदाऱ्या प्रामाणिकपणे पार पाडल्या पाहिजेत. काम करताना अनेक अडचणी येतात, परंतु त्याकडे सकारात्मक ■ पान ४ वर

## अत्याधुनिक उपजिल्हा रुग्णालयाच्या बांधकामाची आमदार भुमरे यांच्याकडून पाहणी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पैठण–** शहरासह ग्रामीण भागातील नागरिकांना सक्षम आरोग्य सुविधा मिळाव्यात, यासाठी उभारण्यात येत असलेल्या अत्याधुनिक उपजिल्हा रुग्णालयाच्या इमारत बांधकामाची आमदार विलास भुमरे यांनी शनिवारी पाहणी करून कामाचा आढावा घेतला.

येथील शासकीय आरोग्य प्रशिक्षण केंद्र परिसरात सुमारे १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय उभारले जात आहे. या रुग्णालयामुळे शहरासह ग्रामीण भागातील नागरिकांना तातडीच्या व दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध होणार आहेत. प्रकल्पासाठी आवश्यक निधी उपलब्ध करण्यात आला असून, काम निर्धारित वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना आमदारांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.



या वेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी, अभियंते तसेच आरोग्य विभागाचे प्रतिनिधी उपस्थित होते. कामाची गुणवत्ता अबाधित ठेवत बांधकाम जलद गतीने पूर्ण करावे, असे निर्देश देण्यात आले.

दरम्यान, या प्रकल्पामुळे परिसरातील आरोग्य व्यवस्थेला मोठा दिलासा मिळणार असून नागरिकांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

## दै. आकर्षण निवडक

### अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाची मागणी

अहिल्यानगर - महाराष्ट्रातील अनुसूचित जाती समाजातील सर्व घटकांना न्याय्य प्रतिनिधित्व मिळावे, यासाठी अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण तात्काळ लागू करण्यात यावे, अशी मागणी कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायतच्या अहिल्यानगर शाखेच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना ई-मेलद्वारे सविस्तर निवेदन पाठविण्यात आले असल्याची माहिती समितीचे निमंत्रक विकास उडाणशिवे यांनी दिली. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, भारतीय राज्यघटनेने अनुसूचित जातींना सामाजिक न्याय, समान संधी, शिक्षण, रोजगार व राजकीय सहभागासाठी आरक्षणाची तरतूद केली आहे. मात्र, प्रत्यक्षात या आरक्षणाचा लाभ सर्व घटकांपर्यंत समान प्रमाणात पोहोचलेला नसून काही मोजक्या जातींपर्यंतच तो अधिक केंद्रित झाल्याची भावना इतर समाजघटकांमध्ये वाढत आहे.शहर व ग्रामीण भागातील कचरा वेचक, तसेच कागद, काच, पत्रा गोळा करून उपजीविका करणाऱ्या कष्टकरी बांधवांपैकी मोठा हिस्सा मांग समाजाचा असून ते आजही अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत जीवन जगत आहेत. असंघटित क्षेत्रात काम करत असल्याने शिक्षण, आरोग्य, निवारा, रोजगार आणि सामाजिक सुरक्षेपासून ते मोठ्या प्रमाणात वंचित राहिले आहेत. अनुसूचित जातींमधील अनेक घटक आजही आर्थिकदृष्ट्या दुर्बल, शैक्षणिकदृष्ट्या मागास आणि सामाजिकदृष्ट्या उपेक्षित असल्याने त्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळण्यात अडचणी येत आहेत. यामुळे सामाजिक न्यायाची संकल्पना पूर्णत्वास जात नसल्याची खंत निवेदनात व्यक्त करण्यात आली आहे. मांग समाजातील नागरिक म्हणून इतर सर्व घटकांबद्दल आदर व एकात्मता राखण्याची भूमिका स्पष्ट करताना, ''आम्हाला कोणत्याही समाजाविरुद्ध संघर्ष नको; मात्र वंचित घटकांना न्याय मिळावा,'' अशी भूमिका संघटनेने मांडली आहे.
गेल्या अनेक दशकांपासून काही जातींना आरक्षणाचा अधिक लाभ मिळत असताना इतर घटक मागे राहिल्यामुळे समाजात नाराजी व असंतोष वाढत असल्याचेही निवेदनात नमूद आहे.

### लग्नात वाटले 'शिवाजी कोण होता?' पुस्तक

अहिल्यानगर ''शिवाजी कोण होता?'' या पुस्तकाच्या शीर्षकावरून निर्माण झालेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर, शिवसेना (एकनाथ शिंदे गट) पक्षाचे आमदार संजय गायकवाड यांनी पुस्तकाच्या प्रकाशकांना अश्लील भाषेत शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा प्रकार घडल्याबद्दल पीपल्स हेल्पलाईनच्या वतीने तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. दरम्यान, छत्रपती शिवाजी महाराजांचा खरा इतिहास जनतेपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने शहरातील महेश भोसले आणि दुर्गा चांदणे यांच्या विवाह सोहळ्यात उपस्थित वऱ्हाडी मंडळींना ''शिवाजी कोण होता?'' हे पुस्तक वाटप करण्यात आले. विवाह सोहळ्यात राजमाता जिजाऊ आणि छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन करून सामाजिक संदेश देण्यात आला. सत्ताधारी आणि अंधभक्तांनी निर्माण केलेल्या तथाकथित ''भोंदूशाही''ला रोखण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला. कार्यक्रमात भावनिक राजकारणाला चालना दिल्याचा आरोप करत, देशाला चुकीच्या दिशेने नेण्याचा प्रयत्न होत असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. पीपल्स हेल्पलाईनचे अध्यक्ष ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. कारभारी गवळी म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज आणि राजमाता जिजाऊ हे केवळ इतिहासापुरते मर्यादित नसून ते आजच्या भारतासाठी जिवंत प्रेरणामिशन आहेत. आजच्या समाजात अजूनही जातव्यवस्था आणि स्त्रीदास्याचे अस्तित्व दिसून येते. मात्र, स्वराज्य स्थापनेच्या काळात शिवाजी महाराज आणि जिजाऊ यांनी अन्यायकारक परंपरांना फाटा देत समानता, स्वातंत्र्य आणि स्वाभिमानावर आधारित स्वराज्य उभारले. त्यांचे राज्य धर्माधारित नव्हते,

# अहिल्यानगरात 'गोदा ते नर्मदा' जलयात्रेचे जंगी स्वागत; जलसंवर्धनाचा संदेश देत उत्साहात आगमन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी





**अहिल्यानगर–** 'गोदा ते नर्मदा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जलयात्रा २०२६' चे आज सायंकाळी ६ वाजता अहिल्यानगर शहरात उत्साहात आगमन झाले. शहरात ठिकठिकाणी नागरिकांनी जलयात्रेचे जंगी स्वागत करत जलसंवर्धनाच्या या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

अहिल्यानगर शहरात 'गोदा ते नर्मदा' जलयात्रेचे आमदार संग्राम जगताप यांच्या वतीने उत्साहात स्वागत करण्यात आले. यावेळी भाजप महायुतीचे सर्व नेते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आल्यानंतर माळीवाडा मार्गे पायी चालत जलयात्रा डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याकडे पुढे सरकली. विशाल गणपती येथे डॉ. सुजय विखे पाटील आणि आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते पारंपरिक कलशासह आरती करण्यात आली. यावेळी वारकरी संप्रदायातील भक्तांचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळाला, तर महिलांनी फुगडी खेळत पारंपरिक उत्सवाचे रंगतदार दर्शन घडवले.

यावेळी बोलताना डॉ सुजय विखे पाटील म्हणाले पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या ३०० व्या जन्मोत्सवानिमित्त आयोजित 'गोदा ते नर्मदा' जलयात्रा ही जनजागृती आणि प्रेरणेचा महत्त्वपूर्ण उपक्रम ठरत आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या यात्रेत अहिल्याबाई होळकर यांनी जलसंधारण आणि पाणी व्यवस्थापन क्षेत्रात केलेल्या कार्याचा संदेश जनतेपर्यंत पोहोचवण्यावर भर देण्यात आला आहे. महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागामार्फत, मंत्री राधाकृष्ण विखे पाटील तसेच गिरीश महाजन यांच्या पुढाकारातून जन्मभूमी चौंडी ते कर्मभूमी महेश्वर असा या यात्रेचा प्रवास आखण्यात आला आहे. या यात्रेद्वारे पाण्याचे महत्त्व, जलसंधारणाची गरज आणि शेतकऱ्यांच्या समृद्धीचा संदेश दिला जात असून महायुती सरकारचे सर्व मंत्री, आमदार आणि खासदार यामध्ये सक्रिय सहभाग घेत आहेत. अहिल्यानगरमध्ये आमदार संग्राम जगताप तसेच महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी या यात्रेचे उत्साहात स्वागत केले, त्याबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली

दरम्यान, या जलयात्रेचा भव्य शुभारंभ श्री क्षेत्र चौंडी, अहिल्यानगर येथे पार पडला. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते तसेच विधान परिषद सभापती राम शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत या ऐतिहासिक उपक्रमाची सुरुवात झाली. प्रारंभी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मस्थळ व समाधीस्थळाला भेट देऊन अभिवादन करण्यात आले. यावेळी डॉ सुजय विखे पाटील यांनी आपल्या प्रास्ताविकातून जलसंवर्धनाचे महत्त्व अधोरेखित केले. अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन पाणी व्यवस्थापनाचा संदेश समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचवण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. तसेच, महायुती सरकारच्या माध्यमातून पुढील तीन वर्षांत अहिल्यानगर जिल्ह्यातील एकही जलसंपदा प्रकल्प प्रलंबित राहणार नाही, असा ठाम निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

ही जलयात्रा केवळ धार्मिक किंवा सांस्कृतिक उपक्रम नसून, जलसंवर्धनाबाबत जनजागृती घडवणारा आणि भविष्यासाठी पाणी सुरक्षित करण्याचा महत्त्वपूर्ण संकल्प असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. या कार्यक्रमाला खासदार रामराव वडकुते, आमदार अमोल खताळ, आमदार काशिनाथ दाते तसेच विविध संत-महंत, वारकरी आणि प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. याशिवाय ग्रामस्थ, महिला भगिनी आणि पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित राहून या ऐतिहासिक जलयात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

## देसवडेच्या चेडोबा पठाराला सुजित झावरे पाटील यांचा आधार



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** पारनेर तालुक्यातील शेवटचे गाव असणारे देसवडे गावातील चेडोबा पठाराला सुजित झावरे पाटील यांचा आधार मिळाला असून हजारो हेक्टर शेतीसाठी अत्यावश्यक असणाऱ्या महत्वाच्या रस्त्याच्या कामाचा भूमिपूजन समारंभ शिवसेना नेते व जिल्हा परिषद माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांच्या हस्ते पार पडला. सुमारे एक किलोमीटर लांबीच्या रस्त्यासाठी १८ लक्ष रुपये निधी मंजूर झाला असून पुढील कामासाठी लागणारा निधीही तात्काळ मंजूर केला जाईल, तसेच देसवडे गावातील सामाजिक सभागृहासाठीही आवश्यक लागणारा निधी उपलब्ध करून दिला जाईल असे आश्वासन सुजित झावरे पाटील यांनी दिले.

हजारो हेक्टर शेती असणाऱ्या चेडोबा पठारावर शेतकऱ्यांना शेतमालाची वाहतूक करण्यासाठी आवश्यक असणारा हा रस्ता अतिशय महत्वाचा होता व या भागातील शेतकऱ्यांनी सुजित झावरे पाटील यांना या रस्त्याची मागणी केली होती. या रस्त्याच्या कामामुळे या भागातील शेतकऱ्यांचा प्रश्न मिटला असून सदर शेतकऱ्यांनी सुजित झावरे पाटील यांचे आभार मानले.

राज्याचे उपमुख्यमंत्री व शिवसेना मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून तालुक्यातील अडचणीच्या रस्त्यासाठी आपण सातत्याने निधी उपलब्ध करून देत आलो असून कोणत्याही गावात नागरिकांच्या पायाभूत सोयीसाठी निधी उपलब्ध करून देण्यासाठी आपण कमी पडणार नसल्याचेही सुजित झावरे पाटील यांनी यावेळी सांगितले. तसेच तालुक्यातील कोणत्याही गावात नागरिकांनी मागितलेल्या कामांना निधी कमी पडून देणार नसल्याचे प्रतिपादन सुजित झावरे पाटील यांनी केले आहे. यावेळी शिवसेना प्रवक्ते संजीव भोर, शिक्षक नेते अमोल साळवे, शिवसेना ढवळपुरी जिल्हा परिषद गटप्रमुख स्वप्नील राहीन्ज, किसन धुमाळ, जेष्ठ नेते निजाम पटेल, शिवसेना उपतालुकाप्रमुख संतोष गाढवे, पोखरी सरपंच सतीश पवार, वारणवाडी सरपंच संजय काशीद, देसवडे सरपंच पोपट दरेकर, चेअरमन संतोष टेकूडे, माजी चेअरमन भाऊसाहेब टेकूडे, माजी चेअरमन संजय भोर, भूमिपुत्र संघटनेचे प्रवक्ते संजय भोर, सोपान वाडेकर, पांडुरंग दरेकर, अविनाश भोर, वैभव गुंड, भाऊसाहेब दरेकर, नवनाथ जाधव, एकनाथ फटांगडे, बाळासाहेब वाडेकर, संजय कोकाटे, संतोष काकडे, रावसाहेब फटांगडे, उल्हास दरेकर, शिवाजी फटांगडे, संकेत भोर, शुभम टेकूडे, संपत दरेकर, सुभाष गोळे, अविनाश भोर व ग्रामस्थ उपस्थित होते.

## पैठणकरांना दिलासा मिळणार? दूषित पाणीप्रश्नी भुमरे आक्रमक; १० दिवसांत कारवाईचे आदेश

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी




**अहिल्यानगर–** शहरातील दूषित व अनियमित पाणीपुरवठ्यामुळे संतप्त झालेल्या नागरिकांना दिलासा देण्यासाठी आमदार विलासबापू भुमरे यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. शुक्रवारी नगर परिषद कार्यालयात घेतलेल्या आढावा बैठकीत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना १० दिवसांत ठोस उपाययोजना करण्याचे सक्त निर्देश दिले.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ढिसाळ व मनमानी कारभारावर बैठकीत जोरदार टीका झाली. वारंवार तक्रारी करूनही प्रश्न मार्गी लागत नसल्याने सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील नगरसेवकांनी एकमुखाने नाराजी व्यक्त केली. प्रशासनाच्या निष्क्रियतेवरही तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. आमदार भुमरे यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना सुनावत कामाचा वेग वाढविण्याचे आदेश दिले. नागरिकांना स्वच्छ व नियमित पाणीपुरवठा देणे ही प्रशासनाची जबाबदारी असून यामध्ये कोणतीही हलगर्जीपणा सहन केला जाणार नसल्याचा इशाराही त्यांनी दिला.

बैठकीस नगराध्यक्षा विद्या कावसानकर, उपनगराध्यक्ष तुषारभाऊ पाटील, नगरसेवक भूषणकाका कावसानकर, हसनोद्दीन कटियारे, लाला वीर आबेद पठाण यांच्यासह मुख्याधिकारी पल्लवी अंभोरे, वरिष्ठ अधिकारी व्यंकटराव पापूलवार आदी उपस्थित होते.

## उन्हाळ्याच्या झळांत वन्यजीवांना दिलासा

**वनविभागाच्या पाणवठ्यामध्ये टँकरने सोडले पाणी; प्रभाकरम फाउंडेशनचा उपक्रम**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** उन्हाळ्याच्या तीव्र झळा वाढत असताना जंगलातील नैसर्गिक पाण्याचे स्रोत आटत चालले आहेत. या पार्श्वभूमीवर प्रभाकरम फाउंडेशनने सामाजिक बांधिलकी जपत चास येथील वनविभागाच्या पाणवठ्यामध्ये टँकरद्वारे पाणी सोडण्याचा उपक्रम राबविला. दरवर्षीप्रमाणे यंदाही फाउंडेशनकडून हा उपक्रम सातत्याने राबविण्यात आला.

फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांनी संबंधित पाणवठ्याची पाहणी करून टँकरच्या माध्यमातून पाणी सोडले. यामुळे बिबटे, हरिण, ससा, कोल्हा, माकड तसेच विविध पशु-पक्ष्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. पाण्याअभावी वन्यप्राण्यांना मानवी वसाहतीकडे वळण्याची वेळ येऊ नये आणि त्यांचे नैसर्गिक अधिवास सुरक्षित राहावेत, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे. या उपक्रमावेळी फाउंडेशनचे अध्यक्ष विपुल तापकीर, उपाध्यक्ष अभिषेक थोरात, सौरभ गावखरे आदी उपस्थित होते.

## जिल्हा वाचनालयात व्यक्तिमत्व विकास शिबिराचे आयोजन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** जिल्हा वाचनालयाच्या वतीने दर वर्षी प्रमाणे या ही वर्षी इ. ३ री ते ८ वी च्या मुलामुलींसाठी सुट्टीत म्हणजेच सोमवार दि.०४ मे २०२६ ते सोमवार दि.११ मे २०२६ या कालावधीत व्यक्तिमत्व विकास शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. दि.०४ मे पासून रोज सकाळी ९.३० ते ११.३० या वेळेत हे शिबीर वाचनालयाचे लोकमान्य टिळक सभागृह येथे होणार असून तज्ञ प्राध्यापिका. सौ. ज्योती कुलकर्णी या श्लोक व स्तोत्रे, बौध्दिक खेळ, कथाकथन व वक्तृत्व, बुध्दि आणि मनाची एकाग्रता, आहार आणि आरोग्य व व्यायाम, हस्तकला, सुखी जीवनाचा मंत्र. इत्यादी सारख्या जीवनात उपयोगी पडणा-या महत्वाच्या विषयांवर मार्गदर्शन करणार आहेत तसेच श्री. अमोल बागुल, श्री. अशोक डोळसे, श्री. शिवाजी नाईकवाडी, सौ. क्रांती मुंदणकर, सौ. साधना महानूर, सौ. आरती पटवर्धन, सौ. नलिनी भालेराव, सौ. आरती सप्तर्षी, इ. मान्यवर मुलांना मार्गदर्शन करणार आहेत.

लहान वयात आपल्या आवडीच्या कलागुणांना वाव देवून त्यात योग्य ते मार्गदर्शन मिळाल्याने लहानपणा पासूनच संस्कारक्षम पाया मजबूत व्हावा या हेतूने हा उपक्रम वाचनालयाने राबविण्याचे योजले आहे. या शिबीरात मुलांसाठी गोष्टी, गाणी इत्यादी बरोबर सुखी जीवनाचे धडे देण्यात येणार आहेत. वाचनालयाच्या वतीने होणा-या या उपक्रमात आपल्या पाल्याला सहभागी करण्यात यावे असे आवाहन अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक व प्रमुख कार्यवाह श्री. विक्रम राठोड, उपाध्यक्ष श्री. अनंत देसाई, दिलीप पांढरे, तसेच, सांस्कृतिक कार्यक्रम प्रमुख श्री. किरण आगरवाल, शिल्पा रसाळ, सदस्य, निमंत्रित सदस्य यांनी केले आहे. संपर्क- ग्रंथपाल-९५९५६६६७७०, सहा. ग्रंथपाल ८१४९१०६३३८

## ओ.सी.पी.एम. स्कूल, वडाळा मिशनचे मुख्याध्यापक नामदेव पतंगे यांचा सेवापूर्तीनिमित्त गौरव

**४० वर्षांच्या ज्ञानसेवेचा सन्मान**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** नेवासा तालुक्यातील वडाळा मिशन येथील ओ.सी.पी.एम. स्कूलचे मुख्याध्यापक नामदेव राजाराम पतंगे यांचा सेवापूर्ती सोहळा उत्साहपूर्ण व भावनिक वातावरणात पार पडला. शिक्षण क्षेत्रात तब्बल ४० वर्षे दिलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल त्यांचा मानपत्र व भेटवस्तू देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठी मिशनचे सचिव डी. जी. भांबळ उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्राथमिकचे शिक्षणाधिकारी भास्कर पाटील व मराठी मिशनच्या अध्यक्षा विजयाताई जाधव उपस्थित होते.

यावेळी ललित दादा मोटे पाटील (सरपंच, वडाळा बहिरोबा), दिलीपराव मोटे पाटील (चेअरमन, जाणता राजा पतसंस्था ), भाऊसाहेब मोटे (संचालक मुळा स सा कारखाना), गुलाब सय्यद (माजी शिक्षणाधिकारी), अभयकुमार वाव्हळ (गटशिक्षणाधिकारी), सुरेश ढवळे (विस्तार अधिकारी माध्यमिक जि.प.), प्रसाद शिंदे (स्वाभिमानी शिक्षक संघटना), विठ्ठल उरमुडे (अध्यक्ष, खाजगी प्राथमिक शाळा संघटना), भास्कर नरसाळे, सुनिल नरसाळे (केंद्रप्रमुख), ज्ञानेश चव्हाण (सचिव रे.शि.प्र. मंडळ), नितीन घाडगे (सहसचिव रे.शि.प्र. मंडळ), रंगनाथ बोबडे (मुख्या ध्यापक रे.शि. प्र.मं. प्राथ विद्यालय) आदी मान्यवर उपस्थित होते.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर - ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर- ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक - विजय शामराव सांगळे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)
The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### अहिल्यानगर तालुक्यातील जलस्त्रोतांच्या दुरुस्तीची मागणी



अहिल्यानगर- अहिल्यानगर तालुक्यात चालू वर्षात झालेल्या अतिवृष्टीमुळे नद्या, तलाव आणि बंधाऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात गाळ साचल्याची गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायत सदस्य तथा खेडेगाव विकास संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्री. बाबासाहेब सहादू धीवर यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना निवेदन सादर करून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. या निवेदनात तालुक्यातील जलस्रोतांची स्थिती सुधारण्यासाठी खोलीकरण व दुरुस्तीची गरज अधोरेखित करण्यात आली आहे. हे निवेदन कार्यालयीन प्रतिनिधी सुरेश फंड यांनी स्वीकारले. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, अतिवृष्टीमुळे नद्यांमधून मोठ्या प्रमाणात वाळू, दगड-गोटे आणि माती वाहून आल्याने तलाव, पाझर तलाव आणि बंधारे निम्म्याहून अधिक भरून गेले आहेत. यामुळे पाणीसाठा कमी होण्याची शक्यता निर्माण झाली असून भविष्यात पाणीटंचाईचा धोका वाढू शकतो. त्यामुळे या जलस्रोतांचे पुनरुज्जीवन करणे अत्यावश्यक असल्याचे धीवर यांनी स्पष्ट केले आहे. यावेळी बोलताना बाबासाहेब धीवर म्हणाले, ''अतिवृष्टी ही नैसर्गिक आपत्ती असली तरी तिचे परिणाम कमी करण्यासाठी प्रशासनाने तातडीने पावले उचलली पाहिजेत. आपल्या गावांतील नद्या, तलाव आणि बंधारे हेच शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावणारे आधार आहेत. जर हेच जलस्रोत गाळाने भरून गेले, तर भविष्यात शेतीसाठी आवश्यक पाण्याची मोठी अडचण निर्माण होईल.'' ते पुढे म्हणाले, ''गावाचा विकास हा केवळ योजनांवर नाही तर प्रत्यक्ष कामांवर अवलंबून असतो. 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' या ध्येयाने प्रेरित होऊन आम्ही गावपातळीवर सतत प्रयत्न करत आहोत. शासनानेही या समस्येची गांभीर्याने दखल घेऊन सर्व जलस्रोतांचे खोलीकरण व दुरुस्ती तातडीने करावी, हीच आमची अपेक्षा आहे. यामुळे भविष्यातील पाणीटंचाई टाळता येईल आणि शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळेल.'' दरम्यान, या निवेदनामुळे तालुक्यातील नागरिक आणि शेतकऱ्यांच्या अपेक्षा वाढल्या असून प्रशासनाकडून लवकरात लवकर ठोस निर्णय घेतला जाईल, अशी आशा व्यक्त केली जात आहे. जलसंपदा विभागाने या मागणीची दखल घेतल्यास तालुक्यातील जलव्यवस्थापन अधिक सक्षम होऊन ग्रामीण भागाच्या विकासाला चालना मिळणार आहे.

### अवैध गौण खनिज प्रकरणात तलाठ्यावर गंभीर आरोप; महसूल बुडवल्याचा दावा

अहिल्यानगर - पारनेर तहसिल कार्यालयाअंतर्गत मौजे ढवळपुरी येथील कामगार तलाठी यांनी अवैध गौण खनिज वाहतूक करणारे वाहन सोडवून शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडविल्याचा गंभीर आरोप अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने करण्यात आला आहे. संबंधित तलाठीवर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ अंतर्गत शिस्तभंगाची कारवाई करून त्यांना कायमस्वरूपी सेवेतून बडतर्फ करण्याची मागणी नाशिक विभागीय आयुक्तांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. समितीचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी २१ दिवसांच्या आत दोषींवर कारवाई न झाल्यास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. निवेदनात नमूद केल्यानुसार, पारनेर तहसिल अंतर्गत ढवळपुरी गावठाणाजवळील के.के. रेंज परिसर हा आर्मी प्रशासनाकडे हस्तांतरित करण्यात आलेला असून, या विस्तृत भागात नद्या, ओढे आणि नाले असल्याने माती, मुरूम व वाळूचे साठे मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. परिणामी, या भागात गौण खनिजांची अवैध वाहतूक मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे.विशेष म्हणजे, महसूल विभागाकडून या अवैध प्रकारांवर नियमित कारवाई होत नसल्याचा आरोप असून, आर्मी गस्त पथकाने वाहन पकडल्यानंतरच महसूल व पोलीस विभागाला बोलावून पंचनामा केला जातो.

# सुदृढ व निरोगी आयुष्यासाठी नियमित आरोग्य तपासणी करणे गरजेचे- डॉ.रोहित गुगळे

**विनायक नगर येथील जैन धर्मस्थानक येथे मोफत कोलेस्टेरॉल व रक्तातील साखरेची पातळी । तपासणी शिबीरास उस्फूर्त प्रतिसाद**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर-** सध्याच्या धावपळीच्या युगात तसेच बदलत्या जीवनशैलीमध्ये प्रत्येकाने आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे. नियमित आरोग्याची तपासणी केल्यास संभाव्य धोके टाळले जाऊ शकतात.विनायक नगर येथे श्रावक संघाने शिबिराच्या माध्यमातून मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन केले.ही बाब कौतुकास्पद आहे.शिबिरातून आरोग्य विषयक जनजागृती होते.सुदृढ व निरोगी आयुष्यासाठी नियमित आरोग्य तपासणी करणे गरजेचे आहे. असे प्रतिपादन डॉ.रोहित गुगळे यांनी केले आहे.

विनायक नगर येथील जैन धर्मस्थानक येथे वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघ (विनायक नगर) व क्रस्ना डिग्नोस्टिक लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत कोलेस्टेरॉल व रक्तातील साखरेची पातळी ची तपासणी शिबीर घेण्यात आले.तसेच फुल बॉडी चेक अप अल्पदरात उपलब्ध करण्यात आले.या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.नवकार मंत्र जाप व परमपूज्य त्रिशालाजी म.सा.यांच्या मांगलिक ने व आशीर्वचन तसेच राजेश गांधी यांच्या मातोश्री श्रीमती तिजाबाई गांधी यांच्या हस्ते धनवंतरी देवी ची पुजा करून शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.यावेळी प्रमुख उपस्थितीत विनायक नगर जैन श्रावक संघा चे अध्यक्ष राजेंद्र भंडारी, डॉ.रोहित गुगळे, डॉ.महावीर गांधी,दिलीप पटवा,राजेंद्र गांधी,विलास पटवा,हिरालाल पटवा,प्रदिप बाबेल,विनोद कटारिया,मनसुख भंडारी,सतीश मांडोत,निखील गांधी,पारस गुंदेचा,सुभाष गुंदेचा,विजय गुगळे,राजेंद्र मेहेर,अमृत कटारिया, संजय भंडारी,संजय संचेती,किशोर गांधी,रसिक बोरा,अशोक बोरा,संजय चोरबेले,सुरपुरिया काकाजी,महावीर बोरा,कांतिलाल कटारिया,चंदू पोखर्णा,विलास गुंदेचा,गौरव मुनोत,रविंद्र शेलोत,किशोर श्रीश्रीमाळ, प्रकाश भंडारी (रांधा),अभिजीत मुथा,उद्योजक रमणलाल भंडारी,सुभाष भंडारी,विजू गांधी आदी उपस्थित होते.

प्रभागाचे नगरसेवक व माजी उपमहापौर गणेश भोसले, प्रकाश भागानगरे,मीनाताई संजय चोपडा,सूनिताताई भगवान फुलसौंदर यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. मा.गणेश भोसले यांनी सर्व नगरसेवकांच्या वतीने विनायकनगर श्रवक संघास नवीन मल्टिपर्पज हॉल आमदार संग्राम जगताप यांच्या विकास निधीतून देण्याचे मान्य केले आहे.त्याची अंमबजावणी लवकरच होईल.तिजाबाई सोभाचंद गांधी (आळेफाटा )यांनी या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक केले.

राजेंद्र भंडारी म्हणाले,विनायक नगर येथे श्रावक संघाच्या वतीने दरवर्षी समाज उपयोगी उपक्रम घेतले जातात.समाजातील प्रत्येक घटकापर्यंत आरोग्याच्या सोयी पोहोचाव्यात यासाठी हे शिबिर घेण्यात आले आहे.शिबिर यशस्वी करण्यासाठी विनायकनगर श्रावक संघ व विनायकनगर बहु मंडळाच्या सर्व सदस्यांनी खूप मेहनत घेतली आहे.तसेच या शिबिरात डॉक्टर्स,तंत्रज्ञ आणि सहकार्य केले.

# नेत्रदूत जालिंदर बोरुडे यांचा शहर सहकारी बँकेत सत्कार

**''महात्मा फुले राष्ट्रीय सन्मान'' व ''समाजभूषण'' पुरस्काराबद्दल गौरव**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर-** सामाजिक कार्यकर्ते तथा 'नेत्रदूत' श्री जालिंदर बोरुडे यांना कोल्हापूर येथील सत्यशोधक प्रागतीक निर्मिती विचार मंचच्या वतीने ''महात्मा फुले राष्ट्रीय सन्मान पुरस्कार'' तसेच बौध्द संस्कार संघाच्या वतीने ''समाजभूषण पुरस्कार'' प्राप्त झाल्याबद्दल शहर सहकारी बँकेच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला.

बँकेचे व्हाईस चेअरमन प्रा. माणिक विधाते आणि बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिनेश लेंखडे यांच्या हस्ते जालिंदर बोरुडे यांचा सत्कार करण्यात आला. आले. उद्योजक वैभव बोरुडे, मखरे, विवेक गायकवाड, आनंद मोकाटे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्रा. माणिक विधाते यांनी जालिंदर बोरुडे यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, त्यांनी फिनिक्स सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून गेल्या तब्बल ३४ वर्षांपासून सातत्याने नेत्रसेवा कार्य सुरू ठेवले आहे. ग्रामीण व शहरी भागात विविध नेत्रतपासणी शिबिरे आयोजित करून हजारो गरजू रुग्णांवर मोफत मोतिबिंदू शस्त्रक्रिया करण्यात त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे. या कार्यामुळे अनेकांना नवजीवन आणि नवदृष्टी मिळाली आहे.

तसेच मरणोत्तर नेत्रदानाबाबत जनजागृती करून समाजामध्ये नेत्रदानाची चळवळ बळकट करण्याचे कार्य त्यांनी केले आहे. अनेक नागरिकांना नेत्रदानासाठी प्रेरित करत समाजहिताचे कार्य पुढे नेले असल्याचेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी जालिंदर बोरुडे यांच्या कार्याचे कौतुक करत त्यांच्या सामाजिक बांधिलकीचे विशेष अभिनंदन केले.

# १ मे महाराष्ट्र दिनी 'नगर जल्लोष'चा सांस्कृतिक सोहळा; संभाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचा जिवंत देखावा ठरणार आकर्षण

**इंडियन आयडॉल गायकांचा सहभाग; शहरभरातून मोफत पासेस उपलब्ध**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर-** महाराष्ट्र दिन निमित्त शहरात दरवर्षीप्रमाणे यंदाही 'नगर जल्लोष' या भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, मागील पंधरा वर्षांपासून सातत्याने हा कार्यक्रम जॉगिंग पार्क, प्रोफेसर कॉलनी येथे मोठ्या उत्साहात पार पडत आहे. यंदाही या कार्यक्रमाच्या भव्य रंगमंच उभारणीचा शुभारंभ नुकताच करण्यात आला असून, नागरिकांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे.

हा बहुप्रतिक्षित कार्यक्रम शुक्रवार, १ मे रोजी सायंकाळी ६ वाजता प्रोफेसर कॉलनी चौकातील जॉगिंग पार्क येथे रंगणार आहे. कार्यक्रमात सिने अभिनेत्री व नृत्यांगना उर्मिला कानिटकर-कोठारे, इंडियन आयडॉल फेम गायक कैवल्य केजकर, सागर म्हात्रे, श्रावणी महाजन तसेच शाहीर रामानंद उगले यांच्या दमदार सादरीकरणाने रसिकांना मंत्रमुग्ध केले जाणार आहे.

या वर्षीच्या 'नगर जल्लोष'चे मुख्य आकर्षण म्हणजे महाराष्ट्रात पहिल्यांदाच सादर होणारा छत्रपती संभाजी महाराजांचा राज्याभिषेक यांचा जिवंत देखावा. भव्य सेट, प्रकाशयोजना आणि कलाकारांच्या प्रभावी सादरीकरणातून इतिहासाचा हा सोहळा प्रत्यक्ष अनुभवण्याची संधी नगरकरांना मिळणार आहे.

कार्यक्रम सर्वांसाठी पूर्णपणे मोफत असून, शहरातील विविध ठिकाणी पासेस उपलब्ध करून देण्यात आले आहेत. त्यामध्ये दिल्लीगेट येथील क्लासिक फोटो, आगरकर मळा येथील मयुरी मॉल, मार्केट यार्डमधील महावीर कलेक्शन, मारुती मंदिर समोर राम एजन्सी, प्रोफेसर कॉलनी चौकातील शिंगवी ज्वेलर्स तसेच झोपडी कॅन्टीन येथील प्रतिष्ठा एथनिक या ठिकाणांचा समावेश आहे.

या आगळ्या-वेगळ्या भव्य कार्यक्रमाला सर्व नगरकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन 'नगर जल्लोष'चे अध्यक्ष सागर बोगा, गुंजन शिंगवी तसेच समिती प्रमुख सुहासभाई मुळे आणि नगर जल्लोष परिवारातर्फे करण्यात आले आहे.

कार्यक्रमाच्या भव्य रंगमंच उभारणीचे भूमिपूजन करून शुभारंभ करण्यात आला. यावेळी तोफखाना पोलीस निरीक्षक चाहेर साहेब, नगरसेवक ऋग्वेद गंधे, समिती प्रमुख सुहासभाई मुळे, सागर बोगा, गुंजन शिंगवी, लौकिक शिंगवी, सुमित राशिनकर, दीपक गुंडू, गजू भाऊ भांडवलकर, नीता राशिनकर, सचिन बोगा, रोहित लाहोर, अनिकेत बोबडे, पल्लवी बोगा, प्राजक्ता बोबडे, आरती बोगा, प्रसाद चिल्वर, प्रकाश मच्चा तसेच नगर जल्लोष परिवारातील सर्व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्हा हिवताप कार्यालय व प्रयत्ना नर्सिंग स्कूल येथे जागतिक हिवताप दिन उत्साहात

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर-** दरवर्षी २५ एप्रिल हा दिवस ''जागतिक हिवताप दिन'' म्हणून साजरा केला जातो. हिवताप (मलेरिया) हा डासांद्वारे पसरणारा गंभीर संसर्गजन्य रोग असून त्याच्या प्रतिबंधासाठी जनजागृती करणे अत्यंत आवश्यक आहे. याच पार्श्वभूमीवर यंदाचा जागतिक हिवताप दिन विविध जनजागृती उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला.

यावर्षी ''हिवताप दूरीकरणासाठी कटिबद्ध, आता हे शक्य आहे... आता हे केलेच पाहिजे!'' या घोषवाक्याखाली हिवताप विभाग अहिल्यानगर शहर व अहिल्यानगर महानगरपालिका, आरोग्य विभाग यांच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या माध्यमातून शहरातील नागरिकांमध्ये डास नियंत्रण व हिवताप प्रतिबंधाबाबत जागरूकता निर्माण करण्यावर भर देण्यात येत आहे.

नागरिकांनी आपल्या परिसरात पाणी साचू न देणे, पाण्याची भांडी झाकून ठेवणे, आठवड्यातून एक दिवस 'कोरडा दिवस' पाळणे, मच्छरदाणीचा वापर करणे तसेच ताप आल्यास त्वरित रक्त तपासणी करून घेणे, असे महत्त्वपूर्ण आवाहन यावेळी करण्यात आले.

आज जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. नारायण वायभासे, अहिल्यानगर आरोग्य विभागाचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर, साथरोग अधिकारी डॉ. सृष्टी बनसोडे, सिव्हिल नागरी आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. आरती डापसे, प्रयत्ना नर्सिंग स्कूलच्या प्राचार्य श्रीमती दीक्षा घाटविसावे, प्रभारी सहा. जि. हि. अधिकारी गजेंद्र सांगळे, तसेच आरोग्य पर्यवेक्षक विलास लटपटे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा हिवताप कार्यालय तसेच प्रयत्ना नर्सिंग स्कूल येथे जागतिक हिवताप दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी हिवताप विभागाचे आरोग्य निरीक्षक पुरुषोत्तम आडेप, सिव्हिल नागरी आरोग्य केंद्रातील एलएचव्ही श्रीमती बांगर, आरोग्य सेविका मीना गुंड, सर्व आरोग्य सेविका, आशा स्वयंसेविका तसेच हिवताप विभागाचे आरोग्य कर्मचारी मनीष ईश्वरे, प्रशांत चव्हाण, अमोल दहातोंडे, विशाल शिंदे आणि दत्ता सातपुते यांनी विशेष प्रयत्न केले.

बिबी. हिवतापमुक्त समाज निर्माण करण्यासाठी प्रशासनाबरोबरच नागरिकांचा सक्रिय सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यामुळे सर्व नागरिकांनी या मोहिमेत सहभागी होऊन स्वच्छता व प्रतिबंधात्मक उपाययोजना काटेकोरपणे पाळाव्यात, असे आवाहन जिल्हा हिवताप कार्यालय तसेच अहिल्यानगर महानगरपालिका आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

# अनामप्रेम मधील दिव्यांग विद्यार्थ्यांना अन्न-धान्याची भेट

**शासनाचा समाजभूषण पुरस्कार प्राप्त सुनिल सकट दांम्पत्यांचा सामाजिक उपक्रम**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर-** स्नेहालय संचलित अनामप्रेम संस्थेत महाराष्ट्र शासनाचा साहित्यरत्न डॉ. अण्णा भाऊ साठे समाजभूषण पुरस्कार प्राप्त सुनिल सकट व सौ. वंदना सुनिल सकट यांनी दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी अन्न-धान्याची भेट देत सामाजिक बांधिलकी जपली. यावेळी विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करून त्यांच्याशी संवाद साधत त्यांना प्रोत्साहन देण्यात आले. कार्यक्रमावेळी संस्थेचे प्रतिनिधी, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हास्य फुलले, समाजातील गरजू घटकांप्रती संवेदनशीलता जपण्याचा संदेश यानिमित्ताने देण्यात आला. यावेळी बोलताना सुनिल सकट म्हणाले की,''समाजात अनेक घटक असे आहेत जे मूलभूत गरजांसाठीही संघर्ष करत आहेत. दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी काम करणाऱ्या संस्थांना सहकार्य करणे ही केवळ मदत नसून आपली सामाजिक जबाबदारी आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना आत्मविश्वास मिळतो आणि त्यांना पुढे जाण्याची प्रेरणा मिळते. भविष्यातही अशा सामाजिक कार्यात सातत्य ठेवणार असून अधिकाधिक लोकांनी या कार्यात सहभागी व्हावे, ही अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

सौ. वंदना सकट म्हणाल्या की, ''दिव्यांग विद्यार्थ्यांना केवळ आर्थिक मदतीची नाही, तर प्रेम, आपुलकी आणि मानसिक आधाराचीही गरज असते. त्यांच्यात अपार क्षमता आहे. योग्य मार्गदर्शन आणि प्रोत्साहन मिळाल्यास तेही समाजात मोठे यश संपादन करू शकतात. अशा उपक्रमांतून आपण त्यांना थोडासा आधार देऊ शकतो, हीच आमची भावना असल्याचे त्यांनी सांगितले.

सुनिल सकट पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन, सार्वजनिक स्वच्छता अभियान यांसारख्या उपक्रमांमध्ये सातत्याने सहभागी होत असतात. तसेच वंचित घटकातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत, साहित्य वितरण, मार्गदर्शन यासाठी ते पुढाकार घेतात. महापुरुषांच्या जयंती व पुण्यतिथी निमित्त विविध सामाजिक उपक्रम राबवून समाजप्रबोधनाचे कार्यही ते करत आहेत. दिव्यांगांसाठीही त्यांचे योगदान सुरु असल्याबद्दल उपस्थितांनी त्यांचे कौतुक केले.

# सरस्वती सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचा ९ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर-** इवलासा जीव जन्माला येतो आणि त्याच्या स्वागताचे आणि पहिल्या स्पर्शाचे भाग्य आम्हाला लाभते अशा भावस्पर्शी भावनेने हजारो स्वप्नांना जन्म देणाऱ्या सरस्वती सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचा ९ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त आयोजित एक अतिशय हृदयस्पर्शी आणि गोड कार्यक्रमाचे दीपप्रज्वलन चार चिमुरड्यांच्या हस्ते करण्यात आले. ही तीच चार मुलं होती ज्यांनी ९ वर्षांपूर्वी याच हॉस्पिटलमध्ये पहिला श्वास घेतला आणि मिचिमिची डोळ्यांनी प्रथमच जग पाहिले. हॉस्पिटलचे संचालक स्त्री रोग तज्ज्ञ डॉ. अमोल जाधव यांच्या संकल्पनेतून साजरा झालेला हा वर्धापन दिन मुलांच्या पालकांनाही जुन्या गोड आठवणीत नेणारा ठरला.

अहिल्या नगर येथील माळीवाडा परिसरातील सरस्वती हॉस्पिटलने दशकपूर्तीकडे वाटचाल करताना सुपर स्पेशालिटी आरोग्य सेवा विस्तार केला आहे. वर्धापन दिनानिमित्त हॉस्पिटलचा शुभारंभ झाल्यानंतर याठिकाणी जन्मलेल्या पहिल्या ४ मुलामुलींना खास आमंत्रित करण्यात आले. माही भळगट, द्रष्टी भंडारी, स्वरा सी. उपरे, राजवीर बोरा या मुलांच्या हस्तेच दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी डॉ . अमोल जाधव, डॉ. प्राजक्ता जाधव, डॉ. स्वाती घुले, डॉ. दिपाली फाळके, डॉ. अमृता घुगरकर, डॉ. राहुल बोरुडे, डॉ. मंगेश कुलकर्णी, आदेश जाधव, किरण लोंढे, श्रुती भंडारी, पूजा भट, आशिष भळगट, दर्शन भंडारी, विक्रम बोरा, प्रिया बोरा, श्री. उपरे आदींसह हॉस्पिटल मधील स्टाफ उपस्थित होता. मुलांसाठी हा एक अतिशय आनंदाचा क्षण होता. आपण याच हॉस्पिटलमध्ये जन्म घेतला व त्याच ठिकाणी ९ वर्षांनंतर आपण कार्यक्रमासाठी आलो आहोत हा एक वेगळाच अनुभव मुलांना आला

स्वागत करताना डॉ. अमोल जाधव म्हणाले की, सरस्वती हॉस्पिटलची मुहूर्तमेढ रोवताना वैद्यकीय क्षेत्रातील अद्ययावत तंत्रज्ञानाचा रूग्णांना लाभ देत जास्तीत जास्त चांगली सेवा देण्याचे ठरवले होते. ९ वर्षांच्या वाटचालीत आमच्या सेवेला रूग्णांच्या विश्वासाची पोचपावती मिळाली आहे. त्यांची आपुलकी कायम प्रेरणादायी ठरली आहे. हॉस्पिटलमध्येच जन्मलेल्या मुलांसमवेत वर्धापन दिन साजरा करताना आनंद द्विगुणित झाला आहे.

दशकपूर्तीकडे वाटचाल करताना सरस्वती हॉस्पिटल सुपर स्पेशालिटी बनले आहे. वैद्यकीय क्षेत्रातील सर्वात आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध करून देण्यात आले आहे. याठिकाणी आता सुपर अ‍ॅडव्हान्स लॅप्रोस्कोपी सुविधा उपलब्ध झाली आहे. गायनेकोलॉजी, जनरल सर्जरी, युरोलॉजी या सर्व विभागांसाठी एकत्रितपणे वापरता येणारी अत्याधुनिक लॅप्रोस्कोपी सिस्टम उपलब्ध करण्यात आली आहे. ४ के/ एचडी व्हिज्युलायझेशन सिस्टीममुळे अत्यंत स्पष्ट आणि झूम डिटेल्स दिसत असल्याने शस्त्रक्रिये दरम्यान अधिक अचूकता मिळण्यास मदत होते. छोट्या चिरांद्वारे ऑपरेशन होऊन कमी वेदना, कमी रक्तस्राव आणि जलद रिकव्हरी होते.सुरक्षित टिश्यू कटिंग आणि ब्लीडिंग कंट्रोलसाठी आधुनिक उपकरणे उपलब्ध आहेत. यामुळे विविध रोगांवरील शस्त्रक्रिया, हर्निया, गॉलब्लॅडर, अपेंडिक्स, किडनी, प्रोस्टेट, संबंधित शस्त्रक्रिया अधिक अचूक होण्यास मदत होते.

# कर्मवीर प्रबोधिनी प्रमाणपत्र स्पर्धा परीक्षेत लक्ष्मीबाई भाऊराव पाटील शाळेचे यश

### पाच विद्यार्थी संस्थेच्या गुणवत्ता यादीत चमकले | अनुष्का धामणे व आदित्य औटी अव्वल



**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** कापड बाजार येथील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील शाळेच्या विद्यार्थ्यांनी रयत शिक्षण संस्थेच्या वतीने घेण्यात आलेल्या कर्मवीर प्रबोधिनी प्रमाणपत्र स्पर्धा परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेची पुन्हा एकदा छाप उमटवली आहे. या परीक्षेत शाळेतील पाच विद्यार्थ्यांनी संस्थेच्या गुणवत्ता यादीत स्थान मिळवून अभिमानास्पद कामगिरी केली.

इयत्ता चौथीतील कुमारी अनुष्का धामणे आणि चि. आदित्य औटी यांनी प्रत्येकी ९६ गुण मिळवत संस्थेत प्रथम क्रमांक पटकावला. चि. वेदांत राहींज आणि चि. आयुष सोनमाळी यांनी ९५ गुणांसह द्वितीय क्रमांक मिळविला, तर चि. सरफराज शेख यांनी ९४ गुण मिळवत तृतीय क्रमांक प्राप्त केला. प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांनी ५ हजार, द्वितीय आलेल्या विद्यार्थ्यांनी ३ हजार आणि तृतीय आलेल्या विद्यार्थ्याने २ हजार रुपयाचे बक्षिस मिळवले.

या गुणवंत विद्यार्थ्यांचा शाळेत विशेष सत्कार करण्यात आला. या प्रसंगी रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य ज्ञानदेव पांडुळे, डॉ. निक्रड, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका छायाताई काकडे, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका लक्ष्मीताई आहेर, पालक संघाचे सदस्य कैलास गुंजाळ तसेच शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जयश्री खांदोडे आणि शितल रोहकले यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. या यशाबद्दल संस्थेचे विभागीय अध्यक्ष तथा आमदार आशुतोष काळे, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य दादाभाऊ कळमकर, विभागीय अधिकारी नवनाथ बोडखे, गुणवत्ता कक्ष मार्गदर्शक काकासाहेब वाळुंजकर, जनरल बॉडी सदस्य ज्ञानदेव पांडुळे तसेच लाइफ मेंबर सदस्य शिवाजी लंके यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# गावंदरा ग्रामस्थांची श्री क्षेत्र भगवानगडाला ५१ लाख रुपये देणगी

### करोडो रुपयांचे शिवधनुष्य पेलविण्यासाठी सर्वांनी सहकार्य करण्याचे आवाहन

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**खरवंडी कासार –** श्री क्षेत्र भगवानगडावरील नियोजित श्री संत ज्ञानेश्वर माऊलींच्या करोडो रुपये खर्च असणाऱ्या मंदिरासाठी महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात देणग्या सुरू आहेत. गडाच्या भक्तवर्गांपैकी अनेक गावांनी आपापल्या देणग्या जाहीर करून देणगीची रक्कम गडाचे मठाधिपती, न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांकडे सुपूर्द केली आहे. देणगीचे बाकी असलेले गावकरी बाबांना सप्ताहानिमित्त किंवा इतर धार्मिक कार्यक्रमानिमित्ताने गावात बोलावून बाबांसमोर आपापले देणगीचे आकडे जाहीर करतात. नंतर संपूर्ण ग्रामस्थ एक विशिष्ट तारीख ठरवून बाबांना बोलावून घेतात व जाहीर केलेली देणगी बाबांकडे सुपूर्द करतात.

श्री क्षेत्र भगवानगडाचे विद्यमान मठाधिपती, ह.भ.प.न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांनी श्री क्षेत्र भगवानगडावर माऊलींचे मंदिर बांधण्याचे ठरविले आणि संपूर्ण महाराष्ट्रातून मंदिरासाठी देणग्यांचा ओघ सुरु झाला आहे. ह.भ.प.न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा हे मौजे गावंदरा (ता.धारूर, जि.बीड) येथे आले असता ग्रामस्थांनी गडावरील माऊलींच्या मंदिरासाठी देणगी द्यायचे ठरविले. त्यानुसार ग्रामस्थांनी आपापल्या देणगीचे आकडे जाहीर केले. जाहीर केलेल्या संपूर्ण आकडेवारीची एकूण गोळाबेरीज ही ५१ लाख रुपये झाली.



(छाया– सतिष जगताप )

नोकरी/व्यवसायानिमित्ताने बाहेरगावी असणाऱ्या ग्रामस्थांच्या देणगीचे आकडे आणखी बाकी आहेत. एकंदरीत श्री क्षेत्र भगवानगडाचा भक्तवर्ग गडावरील माऊलींच्या मंदिराला आर्थिक स्वरुपात हातभार लावण्यासाठी सरसावलेला दिसून येत आहे. त्यामुळे या अभूतपूर्व मंदिरासाठी सर्व ग्रामस्थांनी सहकार्य करावे असे आवाहन श्री क्षेत्र भगवानगड ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.

# सन फार्मा विद्यालयात आरएसपी विद्यार्थ्यांना अग्निशमनाचे प्रशिक्षण

### प्रात्यक्षिकातून विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापन, अग्निशामक दलाच्या कार्याचे धडे



**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महाराष्ट्र राज्य पोलीस गृह विभाग आणि शिक्षण विभागाच्या संयुक्त विद्यमाने वाहतूक सुरक्षा आणि नागरी संरक्षण या विषयांतर्गत नागापूर येथील सन फार्मा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आर. एस.पी. (राष्ट्र विद्यार्थी पोलिस) विद्यार्थ्यांसाठी विशेष अग्निशमन प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना आग विझविण्याचे प्रत्यक्ष धडे देत आपत्कालीन परिस्थितीत कसे वागावे याचे सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

आजच्या धकाधकीच्या जीवनात वाढते तापमान आणि बदलते वातावरण यामुळे विविध प्रकारच्या आगीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचे यावेळी सांगण्यात आले. सध्या ३८ ते ४२ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचणाऱ्या तापमानामुळे इलेक्ट्रिक वाहनांना आग लागणे, माळरान व डोंगर पेट घेणे, घरगुती विजेच्या शॉर्टसर्किटमुळे किंवा गॅस गळतीमुळे लागणाऱ्या आगी अशा घटना वाढल्या आहेत. या पार्श्वभूमीवर आग लागल्यास योग्य उपाययोजना करून ती कशी नियंत्रणात आणावी याचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांना दाखवण्यात आले.

महानगरपालिका अग्निशामक दलाचे अधिकारी शंकर मिसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली अग्निशामक बंबाच्या साहाय्याने विविध प्रकारच्या आगी विझविण्याचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. तसेच विजेचे शॉर्टसर्किट झाल्यास घ्यावयाची खबरदारी, पावसाळ्यात पूरस्थितीत अडकलेल्या नागरिकांना कशी मदत करावी, उंच इमारतींमध्ये आग लागल्यास लोकांना सुरक्षितपणे बाहेर काढण्याचे तंत्र याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

या प्रात्यक्षिकामध्ये अग्निशामक दलाचे कर्मचारी शिवदास वांढेकर, सुरज पोकळे, भारत पाडगे, सिद्धार्थ खरात, मयूर लांडगे, अमोल ढमाले, आतेष भापकर, प्रभात साठे आणि नागनाथ नाईक यांनी सक्रिय सहभाग घेत आपत्कालीन परिस्थितीत करावयाच्या उपाययोजना प्रत्यक्ष करून दाखवल्या. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त टाळ्यांच्या गजरात या कर्मचाऱ्यांचे कौतुक केले.

कार्यक्रमाचे आयोजन विद्यालयाचे मुख्याध्यापक रावसाहेब सातपुते यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. आर.एस.पी. अधिकारी राजेंद्र धस व शंकर बारस्कर यांच्या सहकार्याने हा उपक्रम यशस्वी झाला. यावेळी अरुण ससे, मंगेश निकम, वैभव काळे, रवींद्र गावडे आणि गुंजाळ मॅडम यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या शेवटी आर. एस.पी. अधिकारी राजेंद्र धस यांनी सर्व अग्निशमक दलाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे आभार मानले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आपत्ती व्यवस्थापनाबाबत जागरूकता निर्माण होऊन संकटसमयी धैर्याने व योग्य पद्धतीने प्रतिसाद देण्याची क्षमता विकसित होण्यास मदत होणार असल्याचा विश्वास व्यक्त केला.

## राज्यस्तरीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धे साठी नेक्स्ट लेवल फिटनेसच्या खेळाडूंचे निवड



**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** २५ एप्रिल २०२६ रोजी अहिल्या नगर जिल्हास्तरीय सब ज्युनिअर, ज्युनियर व सिनियर व मास्टर पॉवर लिफ्टिंग चॅम्पियनशिप ()स्पर्धेमधील नेक्स्ट लेवल फिटनेसचे खेळाडू याद्या लांडगे हिने ५७ जुनियर वजन गटामध्ये प्रथम क्रमांक पटकाविला. हर्षल गाडे हिने ७४ ज्युनिअर कॅटेगरी मध्ये द्वितीय क्रमांक, सार्थक गाडे ह्याने ६६ सब ज्युनियर कॅटेगरी मध्ये प्रथम क्रमांक तसेच सोहम गड्डम व कृष्णा सुर्यवंशी ह्याने आपापल्या वजनी गटात प्रथम क्रमांक पटकाविला तसेच मास्टर कॅटेगरी मध्ये अर्चना काळे ह्यांनी प्रथम क्रमांक पटकाविले. तसेच अहिल्या नगर चे मयूर मोहरे, दिवेकर, समर्थ येलमाने , प्रविण चोरमोले, तेजस्विनी बोरुडे, प्रेम थापा, अंश बारसे, फहाद पठाण, अविनाश पांढरे या सर्व खेळाडूंची ३ मे ते १० मे २०२६ दरम्यान मुंबई येथे होणार्या राज्यस्तरीय पॉवर लिफ्टिंग () चॅम्पियनशिप स्पर्धेत निवड झाली आहे. सर्व खेळाडूंना प्रशिक्षक ओंकार गुरम , प्रशिक्षक विजय कनोजिया ह्यांचे मार्गदर्शन लाभले. अहिल्यानगर पॉवरलिफ्टिंग असोसिएशनचे अध्यक्ष डेव्हिड मकासरे व नेक्स्ट लेवल फिटनेस च्या सदस्यांनी पुढील स्पर्धे साठी खेळाडूंचे अभिनंदन केले व शुभेछा दिल्या.



## चिमुकल्यांचा स्विमिंग पूल, ठंडा ठंडा,कूल कूल

**रविवारी नगर शहराचे ४२अंश तापमान होते. उन्हाळ्याच्या वाढत्या झळा असह्य झाल्याने गजराज नगर येथे पाण्याच्या टब मध्ये बसून दोन चिमुकल्यांनी पोहण्याचा आणि थंडगार पाण्यात खेळण्याचा मनमुराद आनंद लुटला. ( छाया– विजय मते)**

# पीके मधून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला वाव – सुरेश क्षीरसागर

### शिक्षकाने विद्यार्थ्यांना वाटली प्रोग्रेस किट (पी.के)

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण–२०२० नुसार राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद () तसेच महाराष्ट्र शासनाच्या राज्य शैक्षणिक व संशोधन परिषद (),पुणे यांच्या शाळा गुणवत्ता मूल्यांकन आणि आश्वासन आराखडा ()अभियान,शांतीलाल मुथा फाउंडेशनच्या मूल्यवर्धन उपक्रमांतर्गत येथील दोन राष्ट्रपती पदकांनी सन्मानित शिक्षक तथा जगातील सर्वाधिक पारितोषिके विजेते कलाकार डॉ.अमोल बागुल यांनी स्वखर्चातून विद्यार्थ्यांच्या विविध वार्षिक उपक्रमाअंतर्गत व्यक्तिमत्व विकास अभिलेखे जपणारी प्रोग्रेसिव्ह किट– पीके()विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या शुभहस्ते वितरित केली आहे.

याप्रसंगी श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे सचिव सुरेश क्षीरसागर,एव्हरेस्ट



अबॅकस अकॅडमीच्या मार्गदर्शिका डॉ.कल्पना घडेकर,प्राचार्या वसुधा जोशी,व्यंकटेश फाउंडेशनचे ज्ञानेश झांबरे ,पर्यवेक्षक लक्ष्मीकांत कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते.'' पीके मधून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला वाव मिळत असून स्वतःची कागदपत्रे अद्ययावत ठेवण्यासाठी विद्यार्थी प्रवृत्त होतील.''असे प्रतिपादन श्री क्षीरसागर यांनी केले.

या किटमध्ये कागदी तिरंगी ध्वजासह,वर्षभरातील स्पर्धांची प्रमाणपत्रे,दस्तऐवज,दिनदर्शिका,सूर्यनमस्कार तक्ता,झाडांच्या बिया,सशस्त्र सेनाध्वज,गोळापत्रक,मूल्यवर्धन पुस्तिका,वह्या पुस्तकांसाठी स्टिकर्स,गणित– भूमिती व बुद्धिमत्ता विषयातील सूत्रे पुस्तिका,मास्क,नासाच्या चांद्रमोहिमेचा बोर्डिंग पास,मनपा निवडणूक प्रमाणपत्रे,भारत सरकारच्या डिजिटल इंडियाच्या इलेक्ट्रॉनिक प्रौद्योगिकी मंत्रालय व संस्कृती मंत्रालयाचे ''हमारा संविधान हमारा स्वाभिमान,वंदे मातरम राष्ट्रीय गीताची १५० वर्ष, एआय परिषद या अभियानांची प्रमाणपत्रे आदी सुमारे ३० शैक्षणिक घटकांचा समावेश आहे.

''वर्गशिक्षक म्हणून शैक्षणिक वर्ष २०२५–२६ मध्ये सर्वंकष सातत्यपूर्ण मूल्यमापनाची उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून सुमारे १०२ विद्यार्थ्यांना मधून मूल्यशिक्षणाची वक्तशीरपणा, नीटनेटकेपणा, श्रमप्रतिष्ठा, सौजन्यशीलता,सर्वधर्मसहिष्णुता,राष्ट्रभक्ती,संवेदनशीलता,वैज्ञानिक दृष्टिकोन, राष्ट्रीय एकात्मता, स्त्री–पुरुष समानता ही दशमूल्ये रुजवण्याचा प्रयत्न करण्यात आला असून उपक्रमासाठी अभिनेते अमीरखान यांच्या प्रसिद्ध हिंदी चित्रपटाचे ''पीके'' हे मनोरंजक नाव लक्षात ठेवण्यासाठी देण्यात आले आहे.''असे डॉ.बागुल यांनी सांगितले.

### स्वाभिमानी मराठा महासंघ महाराष्ट्र राज्य पाथर्डी तालुका अध्यक्षपदी महेश माताडे

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**



**खरवंडी कासार–** पाथर्डी तालुक्यातील खरवंडी कासार येथिल रहवाशी महेश सुरेश माताडे यांची नुकतीच स्वाभिमानी मराठा महासंघ (महाराष्ट्र ) पाथर्डी तालुका अध्यक्षपदी निवड करण्यात आली स्वाभिमानी मराठा महासंघ (महाराष्ट्र )संस्थापक कृष्णराज टकले पाटील स्वराज्य भुषण एम.के .बीएनआरसागर (राष्ट्रीय अध्यक्ष )मराठा रामनारायण (गौरव अध्यक्ष) राजे उज्वलसिंह गायकवाड आंतरराष्ट्रिय सचिव)राजबिर सिंह (राष्ट्रीय सरचिटनिस)सलील सूर्यवंशी ( राष्ट्रिय चिटनिस ) कोकीळा पवार महीला आघाडी राष्ट्रिय अध्यक्षा यांनी सदर निवडीचे पत्र महेश राजे माताडे यांना सादर केले आहे सदर निवडी बद्दल माताडे यांचे खरवंडी कासार परिसरातुन अभिनंद होत आहे

(पान १ वरून)

### वन मजुराला बांधून चंदनाची झाडे तोडून नेणारे दोघे जेरबंद

याने साथीदारांच्या मदतीने हा गुन्हा केल्याचे निष्पन्न केले. या माहितीच्या आधारे छत्रपती संभाजीनगर व जालना जिल्ह्यातील अजिंठा, सिल्लोड, बदनापूर, आडगांव माऊली, खामगांव, पळसे या परिसरामध्ये सलग पाच दिवस आरोपींचा शोध घेऊन मसीद नसीब गोलवाल व शाहीदखा अलीखा कलेसे यांना अतिसंवेदनशील भागातून ताब्यात घेण्यात आले. त्यांच्या दोन साथीदारांचा शोध सुरू आहे.

चौकशीत त्यांनी हा गुन्हा साथीदार असलमखा भुरेखा पठाण व नसीबखा मुनीरखा जोनवाल (रा. माहुली, आडगांव, सरक, ता. जि. छत्रपती संभाजीनगर) अशांनी मिळून केला असल्याची कबुली दिली. या टोळीने छत्रपती संभाजीनगर खंडपीठ परिसरातूनही चंदनाची झाडे चोरली असून या गुन्ह्यात ते फरार असल्याचे निष्पन्न झाले आहे.आरोपींच्या ताब्यातून वीस हजार रुपये किमतीची गुन्ह्यात वापरलेली मोटरसायकल एमएच २८ डब्ल्यू ९७३८ जप्त करण्यात आली आहे.

### गोमातेच्या रक्षणासाठी मकोका सारखा कठोर कायदा व्हावा – आ. संग्राम जगताप

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व तहसीलदार अहिल्यानगर यांना निवेदनाच्या प्रती देण्यात आल्या.

याप्रसंगी बापू ठाणगे, डॉ.अर्जुन घुले, दिनेश खंडेलवाल, गोकुळ आठरे, श्रीमती सुरेखा सांगळे, भरत बोरुडे

योगेश जामगावकर, भैय्या काशिद, संजय जोशी, राजन साळुंकै, अजित कटारिया, अजिंक्य गायकवाड, भारत शिंदे, अनिकेत शिंदे, माऊली गोशाळेचे संचालक माऊली व परीवार, ब्रह्मचैतन्य गोशाळेचे गौतम कराळे व सहकारी, गुंडेगाव येथील गोशाळेचे भापकर विविध गोशाळेचे संचालक विविध मंदिरांचे पुजारी, व्यापारी प्रतिनिधी अबाल वृद्ध व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### एआयचे केंद्र बनण्याची अहिल्यानगरची क्षमता – आ. संग्राम जगताप

वैद्यकीय क्षेत्रात आता रोबोटिक सर्जरी होत आहे. अगदी नगरमध्येही हे तंत्रज्ञान आले आहे. वकिलांचे कामही एआय करत आहे. पोलिस दलातही एआयने प्रवेश केला असून गुन्ह्याचा तपास अधिक गतिमान होत आहे. हे सर्व बदल पाहता नव्या पिढीने हे तंत्रज्ञान अवगत करून नवीन करिअरसाठी सज्ज झाले पाहिजे. ग्रामीण एआय समिट या गोष्टीला चालना देणारे ठरेल.

दिवसभर चाललेल्या समिट मध्ये ''ग्रामीण एआय: ''डिजिटल समावेशनातून बुद्धिमान सक्षमीकरणाकडे'', ''एआयचा नैतिक वापर, डेटा सुरक्षा आणि जबाबदार तंत्रज्ञान'', ''औद्योगिक क्रांतीतील एआय आणि संधी'', एआयच्या माध्यमातून नवीन व्यवसाय संधी ''फिल्म मेकिंग, जाहिरात आणि सोशल मीडिया मार्केटिंगमध्ये एआय'', आरोग्य क्षेत्रातील एआयचा वापर, एआयच्या वापरातून फायदेशीर स्टार्टअप्स व ग्रामीण रोजगार, ''एआय आणि कृषि '' अशा विविध विषयांवर तज्ज्ञांनी प्रभावी मार्गदर्शन केले. समिटला जिल्ह्यातील युवा वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. या समिटसाठी विठ्ठल लांडगे, हर्षल आगळे, संजय आडोळे, विनित जामगावकर आदींनी परिश्रम घेतले.

### दुष्काळमुक्त महाराष्ट्र करण्याचा संकल्प जलयात्रेच्या निमित्ताने पुर्ण करणार

चित्रफितीतून देण्यात आला. पुण्यश्लोक अहील्यादेवींचा पुतळा आणि कलशाचा रथ जलयात्रेचे मुख्य आकर्षण आहे. धनगर नृत्य तसेच मंत्री विखे पाटील यांच्यासह सर्व सहभागी आमदारांचा बस मधून चाललेला प्रवास चर्चेचा विषय ठरला आहे. यात्रेच्या निमिताने आयोजित करण्यात आलेल्या सांस्कृतिक सोहळ्यात बोलताना मंत्री विखे पाटील म्हणाले की,पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जलसंवर्धनाची चळवळ महत्वपूर्ण होतीच पण सांस्कृतिक परंपरेचा वारसा सुध्दा त्यांच्याकडून आपल्याला मिळाला.श्री दासगणू महराजांनी श्री साईबाबा सुवर्ण मंजिरी ग्रंथ महेश्वर येथे लिहीला त्यामुळे शिर्डी आणि महेश्वर नगरीच नात हे अध्यात्माने जोडले गेले असल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले.

### मनपा प्रभाग समिती क्रमांक दोन उत्कृष्ट कामगिरी करत जनरल चॅम्पियनशिपचे मानकरी

दृष्टीकोनातून पाहणे गरजेचे आहे. खेळामुळे मानसिक ताकद वाढते आणि कठीण प्रसंगांना सामोरे जाण्याची क्षमता निर्माण होते. नागरिकांच्या समस्या शांतपणे ऐकून त्यांचे निराकरण करणे ही आपली प्राथमिक जबाबदारी आहे.

''महापालिका ही नागरिकांची संस्था आहे. त्यामुळे आपण आहोत हे लक्षात ठेवून काम केले पाहिजे. प्रामाणिकपणे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे आरोग्यही चांगले राहते. कामाबरोबरच क्रीडा व इतर उपक्रमांमध्ये सहभाग घेतल्यास जीवन अधिक आनंदी आणि निरोगी होते,'' असेही त्यांनी सांगितले. भविष्यात क्रीडा स्पर्धांचे अधिक मोठ्या स्वरूपात आयोजन करण्यात येईल, असे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

मनपा क्रीडा अधिकारी फिलिप्स यांनी स्पर्धांचा आढावा देताना सांगितले की, क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडले.

जनरल चॅम्पियनशिप: प्रभाग समिती क्रमांक दोन क्रिकेट स्पर्धा विजेता: घनकचरा विभाग उपविजेता: प्रभाग समिती क्रमांक तीन (झेंडी गेट) बुद्धिबळ स्पर्धा विजेते: शहर अभियंता मनोज पारखे व संकेत आढाव, उत्कृष्ट गोलंदाज: सागर वैरागर, उत्कृष्ट फलंदाज: सतीश वाघमारे याशिवाय विविध क्रीडा प्रकारांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा यावेळी गौरव करण्यात आला.

या क्रीडा स्पर्धांमुळे कर्मचाऱ्यांमध्ये संघभावना, उत्साह आणि परस्पर सहकार्याची भावना वृद्धिंगत झाली.